उपशिक्षणाधिकारी व तत्सम, गट-ब, महाराष्ट्र शिक्षण सेवा (प्रशासन शाखा) मधील अधिकाऱ्यांची प्रशासकीय बदली.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली ३११९/प्र.क्र.१६०/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १९ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u>:- १. शा.शि.व क्री.वि., शासन निर्णय.क्र.ईएसटी-३११८/प्र.क्र.१२३/प्रशा-२, दि.१४/०६/२०१८

२. मा.उच्च न्यायालय, नागपूर यांचे रिट पिटीशन क्रमांक ३५२७/२०१८ मधील दिनांक ३० जुलै, २०१९ रोजीचे आदेश.

शासन आदेश-

श्री. अनिल नारायण कोल्हे, उपशिक्षणाधिकारी यांची शासन आदेश दिनांक १४.०६.२०१८ अन्वये शिक्षणाधिकारी, महानगरपालिका अमरावती या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली होती. तथापि, सदर पद हे महानगरपालिका कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीचे पद असल्याचा दावा करून डॉ.अब्दुल रजीक अब्दुल हमीद यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे रिट पिटीशन क्रमांक ३५२७/२०१८ दाखल केले होते. सदर रिट पिटीशन मध्ये मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी दिनांक ३०.०७.२०१९ रोजीच्या आदेशान्वये डॉ.अब्दुल रजीक अब्दुल हमीद यांना ६ आठवड्यात पदोन्नतीने पदस्थापना देण्याचे आदेश पारित केले आहेत.

२. मा.उच्च न्यायालय, नागपूर यांचे सदर आदेश विचारात घेता, शासनाचे दिनांक १४.०६.२०१८ रोजीच्या आदेशान्वये श्री. अनिल कोल्हे यांची शिक्षणाधिकारी, महानगरपालिका अमरावती या पदावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्यात येत असून, प्रशासकीय व्यवस्था म्हणून त्यांची पदस्थापना उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अमरावती या पदावर करण्यात येत आहे.

३. श्री. अनिल नारायण कोल्हे यांनी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. अमरावती या पदाचा पदभार त्वरित स्विकारावा तसेच त्यांनी अनधिकृत रजेवर जाऊ नये.

४. आयुक्त (शिक्षण) पुणे यांनी या आदेशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करण्याबाबत संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांना तातडीने कळवावे व श्री. अनिल कोल्हे हे पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू होतील, याची खातरजमा करावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१९११३८२४१९२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Basaveshwar Mamadapure

Digitally signed by Santosh Basaveshwar Mamadapure
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3bfe111652996d95372924b1d22cdf88b33dfa2a3de3d8ea011b7d83adc40cb6, serialNumber=557abe7a7194ec5ddc74df537d7d57a9dbda20b1937a2e41983c35f6a38b6ad8, cn=Santosh Basaveshwar Mamadapure
Date: 2019.09.19 17:24:43 +05'30'

(संतोष ममदापुरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, अमरावती महानगरपालिका, अमरावती
२. आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती, जि. अमरावती
४. सर्व शिक्षण संचालक
५. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, अमरावती
६. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
७. संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२. अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३. निवडनस्ती, प्रशा-२.